फ० 76

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

सिडको पोलीस स्टेशन छत्रपती संभाजीनगर

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** सिडको
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0353 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/06/2025 22:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 23/06/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/06/2025
**Time From (वेळेपासून):** 11:43 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:43 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/06/2025 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 060
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/06/2025 22:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** टिव्ही सेंटर ,पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सचिन संपत जाधव

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोअं बनं 1603 ने श्वनपथक,छत्रपती संभाजीनगर ग्रामीण ,सिडको ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोअं बनं 1603 ने श्वनपथक,छत्रपती संभाजीनगर ग्रामीण ,सिडको ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9552020666

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुभाष रामदास नवलु | | | 1. गवळीपुरा, छावणी,छत्रपती संभाजीनगर,कँटोनमेंट (छावणी ),छत्रपती संभाजीनगर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | कमलेश गोकुल इंदुरकर | | | 1. छावणी ,न्यु लक्ष्मी कलनी घर नं1087,छत्रपती संभाजीनगर , कँटोनमेंट (छावणी ),छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि 23/06/2025

मी सचिन संपत जाधव, वय 32 वर्ष, व्यवसाय नोकरी, पो.अं ब.नं 1603 नेमणुक श्वनपथक छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मो.नं. 9552020666,8263803484

मी वरील प्रमाणे असुन मी दिनांक 05/05/2025 रोजी मा पोलीस अधिक्षक सो ला.प्र.वि छत्रपती संभाजीनगर यांचे समक्ष हजर झाल्यानंतर पो.नि चैनसिंग गुसिंगे साहेबांकडे दोन पंचासमक्ष ऍन्टी करप्शन विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे मी स्वता:चे ü हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली की, मी वरील प्रमाणे असुन मी सन 2014 मध्ये पोलीस अधिक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवर पोलीस कॉंस्टेबल म्हणुन भरती झालो असुन सध्या मी श्वानपथक, पोलीस अधिक्षक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे नेमणुकीस आहे. मी फेब्रुवारी 2025 मौजे पराडा ता. अंबड जि.जालना येथे प्लॉट क्र 14 गट क्र 179 मध्ये प्लॉट खरेदी केला असुन त्यापुर्वी सदर प्लॉट खरेदी करण्याची मा.पोलीस अधीक्षक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथुन दिनांक 25/03/2025 जा.क्र आस्था - 6 /पो.अ/प्लॉट खरेदी/2025/3013 अन्वेय कायदेशीर परवानगी घेतलेली आहे. त्यानंतर सदर प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे D.G अग्रीम (लोन) घरबांधणी अग्रीम 45,00,000/- मिळणे करीता मा. पोलीस अधिक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर, (ग्रा) यांच्या मार्फतीने अर्ज दिनांक 07/04/2025 रोजी आवक जावक येथे सादर केले आहे. त्यानंतर साधारणता 5 दिवसानंतर मी पोलीस अधिक्षक कार्यालय छ.संभाजीनगर ग्रामीण येथे माझ्या घरबांधणी अग्रीम साठी दाखल केलेली फाईल बाबत चौकशी करण्यासाठी घर बांधणी अग्रीम (D.G लोन) टेबलवर गेलो असता तेथे कार्यालईन कर्मचारी नवलु हे हजर होते. श्री नवलु यांना मी माझ्या घरबांधणी अग्रीम फाईल बाबत विचार पुस केली असता श्री नवलु यांनी मला सांगितले की, तुमचे घरबाधणी (D.G) लोनचे काम माझ्याकडे असुन प्रस्ताव लवकरात लवकर पाठविण्यासाठी व D.G लोन मंजुर करून देण्यासाठी मला 3000/- रू दयावे लागतील त्यानंतर मी तेथून निघुन आलो. त्यानंतर श्री नवलु यांनी मला दि. 22/04/2025 रोजी फोन करून मला येऊन भेट असे सांगितले परंतु मी श्री नवलु यांच्याकडे गेलो नाही. आज दिनांक 05/05/2025 रोजी श्री नवलु यांनी मला मो नं 9284317319 या नंबर वरून फोन करुन मा.S.P सो कार्यालय येथे बोलवले होते. त्यामुळे मी श्री नवलु यांच्याकडे मा.S.P कार्यालय येथे गेलो असता. श्री नवलु यांनी मला सांगितले की तुझे घरबांधणी (D.G लोन) चे काम फॉस्ट करून देता त्याकरिता मला 3000/- रू दे असे सांगितल्याने मला मी तेथुन माझ्या आफिसला निघुन आलो. मला श्री नवलु यांना मी दाखल केलेली D.G फाईल ऍग्रीम मिळणे करिता श्री नवलु यांना 3000/- रू लाच देण्याची इच्छा नाही. तसेच त्यांनी मला आज रोजी जा.क्र सी.बी-4/घ.बां.अ/गहणखत/2025/3847 छ.संभाजीनगर (ग्रा) 05/05/2025 अन्वये गहणखत करून देणे बाबत पत्र दिले व लवकर पैसे घेऊन ये आसे सांगितले त्यानंतर मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छ.संभाजीनगर येथे येऊन तक्रार देत आहे. श्री नवलु व माझा कोणताही उसनवारीचा व्यवहार नसुन श्री नवलु यांच्यासोबत माझे कोणतेही वाद नसुन देणे घेणे नाही. श्री नवलु यांना मी माझ्या D.G लोनच्या प्रस्तावा बाबत विचारपुस करण्यासाठी जाणार आहे. त्यांनी मला सदर कामासाठी पैशाची मागणी केल्यास

त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशी लेखी तक्रार दिल्याने पंचांची खात्री झाल्यावर पंचांनी व पोलीस निरिक्षक श्री चैनसिंग गुसिंगे यांनी त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर दिनांक 05/05/2025 रोजी माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पोलीस निरिक्षक श्री चैनसिंग गुसिंगे यांनी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनतर पोलीस निरीक्षक श्री चैनसिंग गुसिंगे सोबत पोलीस उप अधीक्षक साबळे व त्यांची सापळा टिम व दोन पंच असे छत्रपती संभाजीनगर येथुन टि.व्ही.सेंटर छत्रपती संभाजीनगर येथील सुरक्षीत ठिकाणी आल्यानंतर मला व पंचाना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. त्यानंतर सदर लाचमागणी पडताळणी मध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डचा वापर करण्यात येणार असल्याचे मला सांगितले व प्रात्याक्षीक करुन दाखवीले त्यानंतर व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या सोबत पंच क्रमांक 1 श्री विकी रगडे यांना अभि. लोकसेवक यांची भेट घेणे करीता सुरक्षित ठिकाणाहुन 15.35 वाजता  पोलीस अधीक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे माझ्याकडील मोटार सायकलने रवाना केले. मी पंच क्र 1 श्री विकी रगडे असे पोलीस अधिक्षक कार्यालया मध्ये जाऊन अभि.लोकसेवक नवलु यांची भेट घेतली व त्यांच्या सोबत माझ्या प्रलंबीत कामासंदर्भाने विचारपुस केली. त्यावेळी अभि.लोकसेवक नवलु हे म्हणाले की, फोनपे करता का त्यावर मी त्यांना मी हो म्हणालो त्यावर लोकसेवक नवलु हे करून टाका असे म्हणाले व थोडया वेळाने लोकसेवक नवलु म्हणाले की, आत तु ये पुढच्या पगारीलाच ये आता मध्ये कशाला येतो त्यावेळी लोकसेवक नवलु यांनी स्पष्ट लाचेची मागणी न करता तु पगार झाल्यावर ये असे म्हणाल्याने मी व पंच सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी 16.12 वा परत आलो. तेथे पो.अं नंदिले यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्ड बंद करून पोलीस निरिक्षक गुसिंगे साहेब यांचे कडे दिला. त्यानंतर मला व पंचाना घडलेल्या घटने बाबत विचारणा केली तेव्हा आम्ही त्यांना वरील प्रमाणे सर्व हकीकत सांगितली. आम्ही सांगितलेल्या हकिकतीची पडताळणी करणे करीता पोलीस निरीक्षक गुसिंगे साहेब यांनी व्हॉईस रेकार्ड मधील संभाषण ऐकुन खात्री केली.

सदर लाचमागणी पडताळणी दरम्यान माझी व अभि.लोकसेवक यांची भेट झाली व माझ्या कामासंबंधाने चर्चा झाली सदर चर्चे मध्ये अभि.लोकसेवक यांनी स्पष्ट लाचेची मागणी न करता मला तु पगार झाल्यावर ये असे सांगितल्याचे स्पष्ट झाल्याने माझा पगार झाल्यावर अभि.लोकसेवक नवलु यांची भेट घेऊन पुन्हा लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय पो.नि गुसिंगे साहेब यांनी माझ्या व पंचाच्या संमतीने घेतला

त्यानंतर मला अभि.लोकसेवक नवलु यांचा मला दिनांक 18/06/2025 रोजी फोन केला व तुला भेटायचे आहे असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, माझ्या नातेवाईक यांचे निधन झाले आहे त्यामुळे मी गावाकडे आहे. मी संभाजीनगर येथे आल्यावर कॉलकरून तुम्हाला भेटायला येतो.

मी दिनांक 20/06/2025 रोजी संभाजीनगर येथे आल्यानंतर मी पो.नि श्री गुसिंगे साहेब यांना फोन करून सांगितले की, मला लोकसेवक नवलु यांचा फोन आला होता त्यांनी मला भेटण्यासाठी बोलावले असुन मी आज त्यांना भेटण्यासाठी जाणार आहे. त्यावेळी आपण लाचमागणी पडताळणी करावी. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री गुसिंगे हे सुरक्षित ठिकाणी दोन पंच व सापळा पथकासह हजर आले. तेव्हा पुन्हा लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेऊन अभि. लोकसवेक यांना पुर्वीच्या पंचावर शंका येवु नये म्हणुन पंच श्री विकी रगडे यांचे ऐवजी गौतम राऊत यांना पंच क्रमांक 1 म्हणुन नेमण्याचा निर्णय सर्वानुमते घेतला. त्यानंतर माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्ड सुरू करून देवुन मला व पंच श्री राऊत यांना सुरक्षीत ठिकाणाहुन 16.55 वा पोलीस अधिक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे रवाना केले. पोलीस अधिक्षक कार्यालयातील पत्रव्यवहार शाखा येथे गेल्यानंतर माझी व लोकसेवक श्री नवलु यांची भेट झाली. व  माझ्या डि.जी लोन फाईलचे कामसंबंधी चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक नवलु हे म्हणाले की, अन ते माझ करून टाक ना त्यावर मी म्हणालो की, तुमच तुम्ही कस त्यादिवशी ते फोनपेवर नही झाल ना सर तुच मी केल होत. लोकसेवक नवलु हाना असे म्हणाले त्यावर मी म्हणालो आता तुम्हाला किती तीन दयाचे ना. त्यावर नवलु हे देणा यार जे काही दयाचे.असे म्हणाले  त्यावर मी  किती देऊ तीनच ना. असे म्हणालो तेव्हा नवलु म्हणाले देऊन टाकायचे ना लगी. त्यावर मी म्हणालो फोन पे वरच करतो ना आता माझ्याकड कॅश नही सर मी लोढे गिंढे कुण घेतो माझ्याकड नई का सध्या पैशाच लईच प्रॉब्लेम चालु हे त्यावर नवलु ठिक हे ठिक चालतय.असे म्हणाले  तेव्हा मी नवलु यांना विचारले की, तुम्ही दिलेला फोनपे नंबरचे शेवटचे अकडे तिनशे †ÖðÖ¾ÖßÃÖ, आहे का म्हणुन विचारुन त्यावर  किती तीन हजार  असे म्हणालो तेव्हा नवलु करून घे असे म्हणाले त्यानंतर मी व पंच श्री राऊत सुरक्षित ठिकाणी 17.07 वा परत आलो. तेव्हा आमचे कडील व्हाईस रेकॉर्ड पो.अं नंदिले यांनी बंद करून पो.नि श्री गुसिंग साहेब यांचे कडे दिले. व आमच्या मध्ये झालेल्या संभाषणाची खात्री केली. तेव्हा अभि. लोकसेवक यांनी मला त्यांचे नातेवाईक यांचा मोबाईल क्रमांक 8668500328 दिला व सदर मोबाईल क्रमांकाच्या फोनपेवर लाचेची रक्कम टाकणे बाबत सांगितले. तेव्हा माझ्या फोनपे बँक खात्यावर पुरेशी रक्कम नसल्या कारणाने मी त्यांना लाचेची रक्कम देवु शकलो नाही. तसेच माझ्या कडे रक्कमेची जुळवाजुळव झाल्यानंतर मी पोलीस

निरीक्षक श्री गुसिंगे साहेब यांना फोन करून माहीती देईन असे कळविल्यानंतर सापळा कारवाई करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.
त्यानंतर मी दिनांक 23/06/2025 रोजी माझ्याकडे लाचेच्या रक्कमेची जुळवा जुळव झाल्यानंतर मी पोलीस निरिक्षक श्री गुसिंगे साहेब यांना अभि.लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम जुळवा जुळव झाल्याचे सांगितले त्यानंतर मी पो.नि श्री गुसिंग साहेब यांचे सुचने प्रमाणे ला.प्र.वि कार्यालय येथे हजर आलो. त्यानंतर पो.नि गुसिंगे यांनी माझा फोनपे बँक खाते तपासुन खात्यामध्ये रक्कम असल्याची खात्री केल्यानंतर पंच व आम्हा सर्वानुमते सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री गुसिंगे साहेब सोबत पो.नि दिंडे साहेब व सापळा पथक असे आम्ही पंचासह ला.प्र.वि कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथुन पोलीस अधिक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण परीसरात सुरक्षीत ठिकाणी जाऊन थांबलो तेथे पो.नि गुसिंगे साहेब यांचे सुचनेवरून पो. अं नदिले यांनी व्हाईस रेकॉर्डमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्ड सुरु केले त्यानंतर मी अभि.लोकसेवक नवलु यांनी दिलेला मोबाईल क्रमांक 8668500328 या क्रमांकावर माझा मोबाईल क्रमांक 9552020666 यावरून फोन करून खात्री केली तेव्हा सदर मोबाईल क्रमांक हा कमलेश यांचा असल्याचे समजले तसेच लोकसेवक नवलु यांनी दिलेला नंबर तोच असल्याची खात्री झाल्याने त्यावर मी लोकसेवक नवलु यांनी मागणी केल्याप्रमाणे 3000/- रूपये फोनपेव्दारे पाठविले तसेच सदरची रक्कम पाठविलेबाबत स्क्रिनशॉट पाठवुन त्यांना रक्कम प्राप्त झाल्याबाबत फोन करून खात्री केली. तसेच सदर रक्कम पाठविले बाबतचा स्क्रिनशॉट अभि.लोकसेवक नवलु यांना पाठवला तसेच त्यांना पैसे पाठविले बाबत व्हॉटअप वर मेसेज केला असता लोकसेवक नवलु यांनी माझा मेसेज वाचुन मला व्हॉटसऍ◌ॅप कॉल केला व मला ते म्हणाले की, आरे ऐकना केल ना.असे म्हणुन लाचेची रक्कम स्वीकारलेबाबतची पुष्टी केली.
त्यानंतर पोलीस निरिक्षक श्री गुसिंगे साहेब यांचे सुचनेवरून पो.नि दिंडे साहेब व पो.अं चव्हाण यांनी पोलीस अधिक्षक कार्यालय छ.संभाजीनगर येथुन आरोपी लोकसेवक नवलु यांना ताब्यात घेतले व त्यांना स्वता:चा परिचय देवून त्याचे नाव गाव व पद विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुभाष रामदास नवलु वय- 47 वर्षे, व्यवसाय-नोकरी पद कनिष्ठ लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण रा.गवळीपुरा, छावणी छत्रपती संभाजीनगर असे सांगितले.
पो.नि गुसिंगे साहेब यांनी फोनपे व्दारे लाच रक्कम स्वीकारलेले इसम कमलेश यांचा शोध घेतला असता ते धनलक्ष्मी टि.व्ही.एस शोरूम मोरे चौक वाळुज छत्रपती संभाजीनगर येथे मिळुन आल्याने त्यास पो.नि श्री गुसिंगे यांनी परिचय देवुन तसेच सापळा कारवाई बाबत माहीती देवून त्यांना नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव कमलेश गोकुल इंदुरकर वय-47 वर्षे व्यवसाय- खाजगी नोकरी रा.न्यु लक्ष्मी कॉलनी घर नं.1087 छावणी ता.जि. छत्रपती संभाजीनगर असे सांगितले असल्याचे मला समजले आहे.
शब्द संख्या जास्त असल्याने बाकी असलेली फिर्याद शेवटच्या पानावर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

somanath dattatary jadhav(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे सिडको
छत्रपती संभाजीनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): somanath dattatary

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

तरी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या सापळा कारवाई मध्ये आलोसे सुभाष नवलु लिपीक यांनी माझे (डि.जी लोन) घर बांधणी अग्रीमची फाईल लवकरात लवकर ऑनलाईन करून मंजुर करून देण्यासाठी व मदत करण्यासाठी माझ्याकडे 3000/-रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम आरोपी खाजगी इसम कमलेश इंदुरकर यांचे फोनपे क्रमांक 8668500328 वर दिनांक 23/06/2025 रोजी 11.43 वाजता कुणाल किरणा दुकान पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर टि.व्ही सेंटर छत्रपती संभाजीनगर येथुन स्वीकारली म्हणुन माझी आलोसे सुभाष नवलु व आरोपी खाजगी इसम कमलेश इंदुरकर यांच्या विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे मराठीत संगणकावर टाईप केली असुन ती मी वाचुन पाहीली ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे सिडको
छत्रपती संभाजीनगर

फिर्याद दिली सही.